RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# 'संवादपर्व' : पत्रलेखनाचा उत्कृष्ट नमुना

**एल. पी. तांबे**
(मराठी विभाग)
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.

## प्रस्तावना

मा. ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या संवादपर्व (खंड १ ते ५) मधील पत्रवाङ्मय म्हणजे मराठी साहित्यातील अस्सल बावन्नकशी सोन आहे, एक पत्रलेखनाचा उत्कृष्ट नमुना आहे. या विषयाच्या अनुषंगाने मांडणी करताना पत्रवाङ्मयाची संकल्पना, स्वरुप, प्रकार आणि संवादपर्वातील पत्रलेखन शैली इ. गोष्टींचा आढावा घेण्याचे योजिले आहे.

आपल्या देशात पत्रलेखनाची कला प्राचीन काळापासून ते आजपर्यंत अवगत झाली आहे. उदा. रुक्मिणीने सुदेवामार्फत श्रीकृष्णाला पाठविलेले पत्र, ज्ञानेश्वरांना चांगदेवाने लिहिलेले पत्र, रामदासांनी शिवरायांचे गुणवर्णन करणारे संभाजीला लिहिलेले उपदेशपर पत्र, कवी अनिल आणि कुसुमावती देशपांडे यांचा पत्रव्यवहार (कुसुमानिल नावाचा ग्रंथ) इत्यादीतून पत्रलेखन पध्दतीचा अनुभव येतो. त्यामुळे पत्रलेखनास ऐतिहासिक, सामाजिक, शैक्षणिक दृष्टीने अनन्य साधारण महत्व आहे. 'The man is social animal' माणूस हा समाजशील प्राणी असल्याने तो समाजापासून दूर राहू शकत नाही. त्यादृष्टीने व्यक्ती-काळ-समाज यांना समजावून घेण्याचे प्रभावी साधन म्हणून पत्रवाङ्मयाचा विचार करणे उचित ठरले.

## पत्रवाङ्मयाची संकल्पना

पत्रवाङ्मयाचा विचार केला तर पत्रलेखन हे सामान्यतः विशिष्ट व्यक्ति प्रसंगांना उद्देशून केले जाणारे खाजगी व औपचारीक, स्वरुपाचे लेखन असते. पत्रलेखनाचा आत्माविष्कार, काव्यसौंदर्य, जीवनातील घटना-प्रसंग, सांस्कृतिक विचार प्रवाह इ. चे खरे प्रतिबिंब पत्रवाङ्मयात पडलेले असते. सर्वसामान्य माणसाच्या मनातील विचार भावना प्रकट करण्याचे माध्यम म्हणजे पत्रवाङ्मय होय. यालाच मराठी भाषेत पत्र, कार्ड, चिठ्ठीचपाटी, कागदाचा तुकडा असे म्हणतात. हिंदी भाषेत 'खत', इंग्रजीमध्ये Letter म्हणतात.

'पत्र एक संवाद है। संवाद मनुष्यकी आवश्यकता है। मनुष्य का संबंध जब किसी अन्य से निर्माण हुआ । तब से संवाद जारी है। मनुष्य को भाषा अवगत नही थी। उस समय यह संवाद, हावभाव, क्रियाकलावोंसे होता था। कभी वह वस्तू के आदान-प्रदान से भी होता था। परंतु जब मनुष्यने लेखन कला का विकास किया, तब यह संवाद संकेत, चित्र आदि से होता रहा। लिपी-विकास के बाद संवाद को लिखित रुप प्राप्त हुआ। संवाद का लिखित रुप पत्र है और पत्र एक संवाद है।' अशा प्रकारे हिंदी भाषेत पत्रवाङ्मयाचे स्वरुप आहे.

पत्रलेखन करताना मुख्यतः पुढील गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. उदा. पत्रशीर्षक - नाव, पत्ता, दिनांक, सुरुवातीचा मायना, मसुदा, शेवटचा मायना, स्वाक्षरी इ. पत्रलेखनाचे मुख्यतः व्यक्तिगत, खाजगी, व्यावसायिक, कार्यालयीन, काल्पनीक इ. प्रकार सांगता येतील. पत्रलेखन करण्यासाठी मनात भावतरंग निर्माण व्हावे लागतात, तरच पत्र लेखन होते. ती एक मानसिक प्रक्रिया असते. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या उक्तीप्रमाणे पत्रलेखनाची प्रक्रिया सतत घडत असते. पत्रलेखन करणे ही एक कला आहे. आपल्या मित्रमंडळींशी प्रत्यक्ष संवाद साधण्यापेक्षा पत्रातून गुजगोष्टी करणे यासारखा दुसरा आनंद नाही. त्यादृष्टीने मैत्री संपादनाचे महत्वाचे साधन म्हणून पत्रवाङ्मयाकडे पाहावे लागेल.

यासंदर्भात 'प्रसाददीक्षा' या प्रेमा कटकांनी म. गांधीजींना लिहिलेल्या पत्रसंग्रहाच्या प्रस्तावनेत काका कालोलकर यांनी पत्राचे सामाजिक महत्व स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, ''खरे-खुरे पत्रवाङ्मय समाजजीवनातील एक अत्यंत महत्वाचा दस्तऐवज असतो. याकडे साहित्य दृष्टीने न पाहता जबाबदार सामाजिक दृष्टीने पाहिले पाहिजे व त्याच्या वाचनाने केवळ साहित्य, रसिकता तृप्त न करता आपापले जीवन शुध्द, संस्कारी आणि समृध्द करण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करावा."१

पत्रलेखनाचे मोल अनेक कारणांनी घडत असते. पत्रे ही समाजमनाची स्पंदने असतात. सामाजिक जाणिवांचा एक उद्‌गार असतो. कामाच्या गरजेतुन पत्रे लिहिणे आणि काम झाले की पत्र फाडून टाकणे, ही माणसांची सर्वसाधारण प्रवृत्ती असते. आजच्या स्पर्धेच्या जगात आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगात म्हणजेच संगणक, मोबाईल, ई-मेल, इंटरनेटसेवा इ. सुविधांमुळे एकमेकांशी संपर्क साधने सोयीचे झाले आहे. त्यामुळे पत्रलेखन करण्याची प्रवृत्ती कमी होवू लागली आहे. तरी पत्रलेखनाचे महत्व कमी झालेले नाही. ब्रिटनमध्ये पत्र लिहिणे हे प्रतिष्ठित लोक आपले कर्तव्य समजतात. सामान्य माणसाच्या, वाचकाच्या दृष्टीने त्याचे पत्र प्रसिध्द होणे ही एक कौतुकाची बाब असते. लंडन टाईम्स मध्ये ७५ वर्षात प्रसिध्द झालेल्या पत्रांचा संग्रह केनेथ ग्रेगरी यांनी प्रसिध्द केला आहे. इंग्रजी प्रमाणेच मराठीतही पत्रलेखनाची परंपरा अखंड आहे. या संदर्भात पत्रवाङ्मयाचे महत्व स्पष्ट करताना कुसुमावती देशपांडे म्हणतात की, 'पत्रवाङ्मय हा असा अभावितपणे वाङ्मयाच्या पदवीला प्राप्त होणारा आणि म्हणूनच कदाचित इतर बऱ्याच वाङ्मयप्रकारांपेक्षा अनेकदा अधिक सरस, सच्चा, परिणामकारक प्रकार ठरणारा आहे. सर्व चांगल्या वाङ्मयप्रकारांमध्ये जसा व्यक्तिमत्वाचा आविष्कार असतो. तसा त्यात काळाचाही ठसा सापडतो. त्या त्या काळाची सामाजिक परिस्थिती, राजकीय वातावरण, जीवनविषयक विचार इ. ची छाप आढळून येते. पत्रसंग्रहातही तसेच होते. यादृष्टीने पत्राचे महत्व एका दैनंदिनी खेरीज इतर कोणत्याही वाङ्मय प्रकारापेक्षा जास्त समजता येईल.'२

त्यादृष्टीने रावासाहेब शिंदे यांच्या 'संवादपर्व' या ग्रंथाचे महत्व अधिक आहे. 'संवादपर्व' हा ग्रंथ म्हणजे अडीच हजार निवडक पत्रांचा उत्कृष्ट नमुना आहे. त्यापैकी तीनशे पत्रांचा प्रपंच इंग्रजी भाषेतील आहे. रावसाहेब शिंदे यांनी सर्वसामान्य माणसापासून ते उच्चपदस्थ श्रीमंतकोटीच्या मंडळींशी अत्यंत प्रामाणिकपणे, मनमोकळेपणाने पत्रवाङ्मयातून सुसंवाद साधलेला आहे. त्यामधून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू साकार होतात.

'संवादपर्व' या ग्रंथातून रावसाहेब शिंदे यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्रांतीकारक, साहित्यिक, लेखक, शिक्षक, प्राध्यापक, सेवकवर्ग, विद्यार्थी, शेतकरी, कष्टकरी, मजूर, नामवंत, विचारवंत, साधुसंत, (मा. यशवंतराव चव्हाण, मा.ना. शरदराव पवार, मा.ना. पतंगराव कदम, मा. शंकरराव काळे, भाई वैद्य, मुकुंद किर्लोस्कर, चंद्रशेखर धर्माधिकारी, डॉ. नरेंद्र जाधव, डॉ. विवेक सावंत, प्राचार्य दिपा महानवर, कुसुमाग्रज, ना. धों. महानोर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार, विंदा करंदीकर, बाबा आमटे इ.) विविध स्थरांतील मान्यवरांची आलेली पत्रे आणि त्यांच्या पत्राला दिलेली उत्तरे आहेत. यामधून त्यांचा जनसंपर्काचा आवाका किती मोठ्या प्रमाणात आहे याची कल्पना येते. संवादपर्वामध्ये रावसाहेबांसारखा एक लेखक, साहित्यिक, वाचक, रसिक आणि एक हाडामासाचा सामाजिक कार्यकर्ता दडलेला आहे हे स्पष्ट जाणवते.

विशेषत: या पत्रवाङ्मयातून सामाजिक बांधिलकी, आदर्शवादी दृष्टीकोण, सद्‌सद्‌विवेकबुध्दी, देशसेवा, समाजसेवा आणि समाजऋण फेडण्याची वृत्ती इ. गोष्टींचे दर्शन घडते. आपल्या पत्रलेखनाविषयी रावसाहेब शिंदे म्हणतात की, 'पत्रलेखन हा माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. पत्रातून संवाद साधणे मला मनोमनी भावत गेले. त्यात मिळणारा आनंद मात्र पत्रलेखकालाच समजणार आणि त्याहीपेक्षा त्यातून निर्माण होणारे भावबंधनाचे नाते याचे मोल देखील त्यालाच जाणवणार. माझ्या पत्रव्यवहारामुळे माझी जीवन संस्कृती संपन्न झाल्याचे मला दिवसेंदिवस भावतच गेले. मनातल्या सुखदु:खाच्या, आनंदाच्या

प्रेरणादायी भावभावनांचे आदान प्रदान होताना मनाला किती आल्हाद वाटतो. आनंदाने मन कसे हलके हलके होते. दु:खाचे, चिंतेचे आणि काळजीचे आझे सुसह्य होते..... माझ्या पत्रव्यवहाराच्या या संग्रहात मानवाच्या स्वरुपांचे दर्शन मला तर झालेच पण तसेच ते वाचकांनाही होईल असा माझा विश्वास आहे. या पत्रसंग्रहात नीती, सद्सद्विवेकबुध्दी, ध्येयवादी जीवन जगण्याची उर्मी याचे दिग्दर्शन मला जाणवते. तसेच त्यात देशभक्ती, समाजसेवा, देण्याची वृत्ती, अन्यायाविरुध्द लढण्याची ईर्ष्या, दुसऱ्यासाठी जगण्याची प्रेरणा आणि या सर्वांसाठी वाटेल तो त्याग करण्याची मनाची तयारी या संबंधीचे प्रकटन देखील साकारले असावे.'३

'संवादपर्व' या ग्रंथाचे अवलोकन केले तर रावसाहेबांनी आपल्या देशवासियांप्रमाणेच परकीयांवर मनापासून प्रेम केले. मैत्रीचा हात देवून दिलखुलासपणे सुसंवाद साधला. मैत्रीरुपाने पत्रलेखन केले. याचा प्रत्यय फादर दि ब्रिओ, सिस्टर ख्रिस्तीन, सिस्टर ॲनी, ख्रिश्चन मिशनरी इ. च्या पत्रलेखनातून येतो. त्यामुळे त्यांच्या पत्रवाङ्मयातून शिक्षण, समाज, संस्कृती, मानवीजीवन आणि सभोवतालचा परिसर, सामाजिक, धार्मिक आचार विचार इ. चे दर्शन घडते. यावरून असे दिसून येते की, रावसाहेबांचा पत्रव्यवहार हा देश, परदेश, जात, धर्म, पंथ, गरीब, श्रीमंतांपर्यंत होता याची साक्ष पटते. या संदर्भात सुखदेव सुकले म्हणतात की, "ॲड. रावसाहेब शिंदे यांचा 'संवादपत्रा'चा शब्दप्रपंच म्हणजे मानवतेशी अखंड चालणारा संवाद आहे, माणुसकीचा गहिवर आणि नीतीमूल्यांचा फुलवर हा यातून फुलतानाच दिसतो आहे. ही सर्व पत्रे म्हणजे वाङ्मय मंदिरातील पवित्र घंटानाद आहे ..... त्यामुळे या पत्रांना वाङ्मयीन, सामाजिक व सांस्कृतिक दर्जा प्राप्त झाला आहे."४

संवादपर्वातील पत्रलेखनाचे सर्व श्रेय त्यांनी आपल्या सुसंस्कृत, आदर्श धर्मपत्नीला दिलेले आहे. कारण माझ्या पत्रव्यवहाराचा मोलाचा ठेवा तिने काळजीपूर्वक जतन करुन ठेवला हे माझे भाग्यच आहे. असे ते अभिमानाने सांगतात. असे म्हटले जाते की, प्रत्येक पुरुषाच्या यशामागे स्त्रीचा हात असतो याचा अनुभव या प्रसंगातून येतो.

'संवादपर्वा'च्या भाषा शैलीच्या अंगाने विचार केला तर, या ग्रंथाची भाषा मराठी, हिंदी, इंग्रजी वळणाची आहे. शब्दांमध्ये गोडवा आहे, माणूसकीचा झरा आहे आणि लेखन शैलीची खास वैशिष्ट्ये दडलेली आहेत. ती खालील प्रमाणे सांगता येतील.

'आनंदवनात तर दिव्यत्वाची प्रचिती हमखास घडते. परमपूज्य बाबांनी घडविलेली नव्या माणसांची नवी दुनिया. निर्मळ गंगेत मगर असतील, तर चिखलातही कमळे फुलतील. बाबांनी अशी चिखलात कमळे फुलविली.' (संवादपर्व-खंड २ पृ नं. १२-१३)

'मराठी मातीशी, मराठी मनाशी आणि पुरोगामी विचारांशी एकरुप असलेल्या या महान अशा मराठमोळ्या साहित्यिकांचा, कविंचा तुम्ही उचित सन्मान केला. पुरोगामी विचारांच्या कविंच्या उपेक्षेने कोमेजलेल्या महाराष्ट्र सारस्वताचा चेहरा खुदकन हसला असणार, महाराष्ट्र साहित्य संस्कृतीच्या इतिहासात तुमची कृती ही सुवर्ण अक्षरात शोभून दिसावी. तुमच्या उच्च अभिरुचीचे हे दर्शन आहे.' (संवादपर्व-खंड २ पृ ४८) यामधून त्यांच्या लेखन शैलीचा अनुभव येतो.

'प्रारंभी, बालपणीचा सुखाचा काळ किती मनोज्ञ वास्तव पध्दतीने चित्रीत होत राहातो, याचा आनंद वाटतो. त्यांच्या गावाचे नाव 'पाडळी'. तेथील शिवार कसे नटलेले दिसायचे, शिवारात गढीचे शेत, त्याला पांढऱ्या मातीचा कोट बुरुज, ही शिंदेची गढी. शिंदे गढीचे वतनदार. गाव लहान, सव्वाशे उंबरा, लोकसंख्या पाचशे, मारुतीच्या देवळाची दगडी इमारत, समोर पटांगण, त्याला मोठा पार, त्यावर मोठा पिंपळ, जणू सोन्याचा. डोंगर कुशीत ठाकरवाडी ही ठाकरांची वस्ती. गावकुसाबाहेर दलितवस्ती. त्यांचे काही सवंगडी दलित होते. त्यांची नावे कचरू आव्हाड, संभा आव्हाड, निवृत्ती रुपवते. या मुलांबरोबर खेळताना बाटाबाटी व्हायची, शिंदे यांचे आई-वडील शिवाशिव पाळत, पण या मुलांना खायला प्यायला देत.' (संवादपर्व-खंड २ पान नं. ३९०-९१) या मधून ग्रामीण जीवनाचे यथार्थ दर्शन घडते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

'संवादपर्वा'मध्ये विविधता, विपूलता, मौलिकता, वैविध्यपूर्णता, वैचारिकता, कल्पकता, काव्यात्मकता इ. लेखन शैलीची वैशिष्टये दडलेली आहेत. हा ग्रंथ एक पत्र संस्कृतीचा अमोल ठेवा आहे, भाषा शैलीचा उत्कृष्ट नमूना आहे. या ग्रंथातील मराठी-इंग्रजी भाषेतील पत्रलेखन अत्यंत वाचनीय आहेत. विशेषतः या पत्रवाङ्मयामध्ये परमप्रिय, आदरणीय, स्नेहांकित, चाहता, कृतज्ञतापूर्वक, नम्र, आपला नम्र, विश्वासू, स.न.वि.वि., साष्टांग नमस्कार, आशीर्वाद, कळावे, लोभ असावा ही प्रार्थना, स्नेहवंदे, विनंती विशेष. इ. शब्दांमधून त्यांचा मानतावाद आणि आदर्शवाद स्पष्ट होतो.

सारांशतः रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या 'संवादपर्व' (खंड १ ते ५) या ग्रंथाचा विचार केला तर, त्यांच्या आयुष्यातील अनेक घटनाप्रसंगांच्या निमित्ताने घडलेला प्रवास, ऋणानुबंधांच्या पडलेल्या गाठीभेटी आणि त्यामधून झालेला पत्रव्यवहार असे या ग्रंथाचे सर्वसाधारण स्वरुप आहे. विशेषतः पत्र रुपाने दुरच्या व्यक्तिशी संवाद कसा साधावा, पत्रमैत्री कशी करावी, माणसे कशी जोडावीत आणि छोट्या मोठ्या मंडळींना पत्रलेखन कसे करावे. या सर्व गोष्टींचा आदर्श पाठ म्हणजे संवादपर्व हा ग्रंथ होय. ज्याप्रमाणे श्रीकृष्णाने 'सुदाम्याचे पोहे'चा आनंदाने आस्वाद घेतला त्याप्रमाणे संवादपर्वातील पत्र वाङ्मयाचा आस्वाद रसिकांनी घ्यावा आणि या ग्रंथाचा सामाजिक अंगाने अभ्यास व्हावा असे मनापासून वाटते.

**संदर्भ**

१) कर्वे स्वाती (संपादक), स्त्रियांची शतपत्रे (इ.स. १८५० ते इ.स.१९५०), प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती - २००९ पृ. १६.

२) तत्रैव पृ. १६.

३) मस्के ज्ञानदेव व इतर (संपादक सदस्य) संवादपर्व खंड-१, अमेय प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती - जुलै २०११ पृ. ७.

४) तत्रैव पृ. ३९.

५) जोशी लक्ष्मणशास्त्री - विश्वकोश, खंड-१, म. रा. मा. संस्कृती मंडळ, मुबई, प्रथम प्रकाशन १९८०.

६) जोशी वसंत (संपादक) भाषा व साहीत्य संशोधन, खंड पहिला, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती २००६.

७) तावरे स्नेहल (संपादक) व्यावहारिक मराठी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती २००४.

८) सिंह अनिल, अभिनव व्यावहारिक पत्रलेखन , ज्योती प्रकाशन, ठाणे, प्रथम संकरण १९९९.

- संवादपर्व रावसाहेब शिंदे यांचा समग्र पत्रसंवाद, खंड १ ते ५